Shanti Education Society's
A. G. Patil Polytechnic Institute, Solapur
NBA ACCREDITED PROGRAMS
(Approved by AICTE, New Delhi; Recognized by Govt. of Maharashtra; Affiliated to MSBTE, Mumbai)
ISO 9001:2015 CERTIFIED DTE Inst. Code : D6443 MSBTE Inst. Code : 0995

18(2/2A)2, Pratap Nagar, Opp. S.R.P. Camp, Vijapur Road, Solapur- 413008 (Maharashtra, India)
Ph.No.: 0217-2341899 E-mail: agppi.contact@gmail.com Web: www.agppi.edu.in

AGPPI/Admin./Internal/2026-27/066 Date: 31.10.2026

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ : परीक्षा फी माफीसंदर्भात.....

संदर्भ : १. शालेय शिक्षण विभाग शा.नि.क्रएफईडी १५९२ / १२०२ / (११३२) / साशि-५, दि. १८.१०.१९९३
२. मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्र. समिती २६ / प्र.क्र.८२ / मदत / २, दि. २५.०९.२०२६
३. संचालनालयाचे पत्र क्र. २ / एनजीसी / परिक्षा शुल्कमाफी / २०२६ / ८३१, दि. १४.१०.२०२६
४. सहसंचालक तंत्रशिक्षण वि.क्षे., पुणे यांचे पत्र तंशिविक्षपु / शै.वि. / २०२६ / ४१३६, दि. ३०.१०.२०२६

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील नियमित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य शासनाद्वारे संदर्भिय शासन निर्णय व शासन परिपत्रकानुसार राज्यातील तालुक्यांमध्ये जून ते आज पर्यंत या कालावधीतील पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळग्रस्त Trigger-1 (पहिला कळ) परिस्थिती असल्याने शासनाकडून विशेष बाब म्हणून करण्यात येणाऱ्या उपयोजनेअंतर्गत सदर दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ करण्यात येणार आहे.

सदर सवलतीचा फायदा घेण्याकरीता पात्रता, नियम व अधिक माहितीकरीता सोबतच्या संदर्भिय शासन निर्णय व शासन परिपत्रांचे आवलोकन करून **पात्र विद्यार्थ्यांनी पुढील कार्यवाहीकरीता हस्तलिखीत अर्ज खाली नमुद आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयात सोमवार, दि. ०२.११.२०२६ पर्यंत सादर करावे.** सदर मुदतीत अर्ज सादर न केल्यामुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानिस विद्यार्थी स्वतः जबाबदार असतील याची सर्व संबंधीतांनी गांभिर्यपूर्वक नोंद घ्यावी.

टिप : सदर बाबतीत कांही अडचणी किंवा शंका असल्यास महाविद्यालयाच्या कार्यालयातील श्री मोफरे ए. व्ही. (8888813081 / 9226886440) यांना संपर्क साधावे.

आवश्यक कागदपत्रे :

१. पालक व विद्यार्थीचे परीक्षा फी माफीबाबतचे एकत्रीत लेखी अर्ज
(अर्जात कायमचा व सध्याचा पत्ता नमुद असावा)
२. महाविद्यालयाचे ओळखपत्र (I-Card)
३. हिवाळी परीक्षा २०२६ चे हॉलटिकीट (Hall Ticket)
४. विद्यार्थी व पालकांचा रहिवासी दाखला (सक्षम अधिकारी यांच्या सही व शिक्क्यासहीत)
५. पालकांचा मागील वर्षाचा उत्पनाचा दाखला (सक्षम अधिकारी यांच्या सही व शिक्क्यासहीत)
६. परीक्षा शुल्क इतर शासकीय प्राधिकरणाकडून प्राप्त न होण्याबाबतचे हमीपत्र
(कार्यालयात उपलब्ध)

डॉ. एम. ए. चोगुले
प्राचार्य
ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट
सोलापूर.

प्रत :
1. VP 2. CE 3. CO 4. EE 5. EJ
6. ME 7. H&S 8. Account Section 9. Mr. Mophare A. V.
10. Web Portal 11. Admin.

महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
Website : www.ropune.org.in

जा. क्र : तंशिविकापु/शै.वि./२०२६/४१५६ दिनांक : ३० ऑक्टोबर २०२६

परिपत्रक-

प्रति,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व संस्था, पुणे

विषय- राज्यातील अवर्षणग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्काची प्रतिपूर्तीबाबत.

सदर्भ- १. संचालनालयाचे पत्र क्र.२/एनजीसी/परिक्षा शुल्क माफी/२०२६/८३१ दि.१४.१०.२०२६
२. शालेय शिक्षण विभाग शा.नि.क्र.एफईडी२५९२/१२०२/(११३२)/साशि-५ दि.१८.१०.१९९३
३. मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्र. समिती २६/प्र.क्र.८२/मदत/२, दि.२५.०९.२०२६
४. शासन पत्र उ व तं शि विभाग क्र.ई-१८७०५८४/२७१०१०/२६१/२०२६-एमएचटी (एचई-२), दि.३०.०९.२०२६
५. शासन पत्र उ व तं शि विभाग क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.८५५/ई-१८८९७९९/तांशि-४ दि.१४.१०.२०२६.

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भिय पत्र व शासन निर्णयाच्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व अभ्यासक्रमाच्या संस्थांना कळविण्यात येते की, राज्यातील "**अवर्षणग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफी योजना**" बाबत संदर्भ क्र.०२ चा शासन निर्णय कार्यान्वीत आहे. आता संदर्भ क्र.०३ च्या शासन निर्णयानुसार सन २०२६ च्या खरीप हंगामातील Triger-1 (प्रथम कळ) लागू झालेल्या ३४ जिल्हयातील २६५ तालुक्यात दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयामध्ये दुष्काळ ग्रस्त परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये आपल्या विभागातील तालुक्यांतील रहिवाशी असलेल्या शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याच्या सवलतीचा समावेश आहे.

शासनाच्या संदर्भाधीन क्र.०५ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार आपल्या विभागातील सर्व संस्थांनी **संदर्भ क्र.०१ च्या संचालनालयाच्या पत्रातील १ ते ६ मुद्दयांचे अनुपालन करावे**. व सोबत जोडलेले " विवरणपत्र -अ " मध्ये आपल्या संस्थेची माहिती भरून या विभागीय कार्यालयाकडे (हार्ड कॉपी) दि.०६.११.२०२६ पर्यंत सादर करावी. तसेच सोबत दिलेल्या गुगल फॉर्म मध्ये आपल्या संस्थेची माहिती भरून विवरणपत्र -अ ची पीडीएफ अपलोड करावी.

सोबत- संदर्भ १ ते ५.

(डॉ. सु. आ. पाटील)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- प्रोग्रॅमर, तं.शि.वि.कार्यालय, पुणे यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५६/ /४७५/४४२/४४३,
ई-मेल- desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : २/एनजीसी/परीक्षा शुल्क माफी/ २०२६/C39 दिनांक : 14 OCT 2026

प्रति,

१. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, अमरावती, नागपुर,

२. कुलसचिव,
- सर्व अकृषि विद्यापीठे,
- डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,लोणेरे
- सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठ,पुणे
- आयसीटी,मुंबई
- लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ,नागपूर

३. संचालक/प्राचार्य
तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व स्वायत्त संस्था

४. सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई

विषय- राज्यातील अवर्षणग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत

संदर्भ-१. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एफईडी १५९२/१२०२/ (११३२)/साशि-५, दि. १८.१०.१९९३
२. मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्र. समिती २६/प्र.क्र.८२/मदत/ २, दि.२५.०९.२०२६.
३. शासन पत्र उ व तं शि विभाग क्रमांक E-१८७०५८४/२७१०१०/२६१/२०२६-MHT (HE-२), दि.३०.०९.२०२६
४.शासन पत्र उ व तं शि विभाग क्रमांक क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.८५५/ई-१८८९७९९/तांशि-४ दि : १४ ऑक्टोबर, २०२६

राज्यातील "अवर्षणग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफी योजना" संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये कार्यान्वीत आहे. आता संदर्भिय शासन निर्णय क्रमांक २ नुसार, सन २०२६ च्या खरीप हंगामातील Triger-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या ३४ जिल्हयातील २६५ तालुक्यात दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयामध्ये दुष्काळ ग्रस्त परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये सदर तालुक्यांतील रहिवाशी असलेल्या शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याच्या सवलतीचा समावेश आहे.

शासनाच्या संदर्भाधीन क्रमांक ४ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार आपल्या विभागांतर्गत असलेल्या तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना खालील प्रमाणे सुचना देण्यात याव्यात.

१. संदर्भ क्रमांक १ येथील १८ ऑक्टोंबर, १९९३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दुष्काळ सदृश्य तालुक्यातील सवलतीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदन पत्रे विद्यापीठाकडे/मंडळाकडे संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयात नमुद केलेल्या प्रमाणपत्रावर सांक्षाकित करुन पाठवावे. संस्थाप्रमुखांनी प्रस्ताव सादर करताना विद्यार्थी संबंधित दुष्काळग्रस्त तालुक्यातील रहिवाशी असल्याची खात्री करावी.

२. संस्थांकडून प्राप्त झालेल्या माहितीची विद्यापीठांनी तपासणी करुन व ती माहिती प्रमाणित करुन सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाकडे आवश्यक रक्कमेची मागणी विवरणपत्र अ नुसार करावी.

३. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांनी विद्यापीठांकडून/ स्वायत्त महाविद्यालयांकडून आलेल्या माहितीची तपासणी करुन आवश्यक रक्कमेची माहिती प्रमाणित करुन संचालनालयाकडे सोबतच्या "विवरणपत्र अ" मध्ये सादर करावी. मागणी करताना यासोबत जोडलेले विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

४. परीक्षा शुल्क माफीच्या रक्कमेची माहिती सादर केल्यानंतर संचालनालयाकडून शासनास प्रस्ताव सादर करण्यात येईल. शासनाकडून प्रतिपूर्तीची रक्कम उपलब्ध झाल्यानंतर संचालनालय स्तरावरुन विभागीय कार्यालयांना सदर योजनेसाठी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल.

५. शासनाने संदर्भाधीन दिनांक २५.९.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये जाहीर केलेल्या दुष्काळग्रस्त तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

६. सर्व पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांनी परीक्षा फी प्रतिपूर्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांच्या नावाच्या यादीसह विद्यार्थी संख्या व एकूण शुल्काची रक्कम संबंधित महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या विभागीय कार्यालयाकडे विहीत विवरणपत्रात सादर करावी. मंडळाच्या विभागीय कार्यालयांनी प्राप्त माहिती तपासून व प्रमाणित करुन ,सचिव,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचेकडे सादर करावी. सचिव,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांनी उपरोक्त क्रमांक ४ मध्ये निर्देशित केल्यानुसार संचालनालयाकडे माहिती सादर करावी.

(प्रमोद नाईक)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. मा.खाजगी सचिव,मा.मंत्रीमहोदय,उच्च व तंत्रशिक्षण ,महाराष्ट्र राज्य यांना माहितीस्तव सादर
२. मा.अपर मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन,मुंबई यांना माहितीसाठी सादर
३. सचिव,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी
४. कार्यासन क्रमांक ३,७,९,१०, १५,१८ मुख्य कार्यालय मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

"जनहिताय सर्वदा"

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

४ था मजला, मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्र.०२२०४०९३५. Email ID: tashi4-hted@mah.gov.in

क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.८५५/ई-१८८९७९९/तांशि-४ दिनांक : १४ ऑक्टोबर, २०२६.

प्रति,

संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय :- राज्यातील अवर्षणग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत.

संदर्भ :- १. शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.एफईडी-१५९२/(११३२)/ साशि-५, दि.१८.१०.१९९३
२. मदत व पुनर्वसन विभाग, शासन निर्णय क्र.समिती-२०२६/प्र.क्र.८२ / मदत-२, दि.२५.०९.२०२६
३. E-१८७०५८४/२७१०१०/२६१/२०२६-MHT(HE-२), दि.३०.०९.२०२६

महोदय,

राज्यातील "अवर्षणग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफी योजना" संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये कार्यान्वित आहे. आता, सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करणेबाबतचा निर्णय मदत व पुनर्वसन विभागाच्या संदर्भाधीन दि.२५.०९.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार सवलतींतर्गत २६५ तालुक्यांतील शालेय / महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफी करण्यात आलेली आहे.

२. उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाने संदर्भाधीन क्र.३ येथील पत्रान्वये उच्च शिक्षण संचालनालयास खालीलप्रमाणे सूचना दिलेल्या आहेत (प्रत संलग्न):-

"मदत व पुनर्वसन विभागाने दुष्काळी परिस्थिती जाहीर केलेल्या भागातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याच्या अनुषंगाने सार्वजनिक विद्यापीठांचे सर्व कुलसचिव आणि सर्व विभागीय सहसंचालक यांना संचालनालय स्तरावरुन कळविण्यात यावे. तसेच, सदर बाब सर्व संबंधित शैक्षणिक संस्था / महाविद्यालयांच्या निदर्शनास आणण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी. सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने

अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्यास त्याबाबतचा पुरवणी मागणीचा सविस्तर प्रस्ताव शासनास सत्वर सादर करावा."

३. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या संदर्भाधिन क्र.३ येथील दि.३०.०९.२०२६ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या उपरोक्त सूचना तंत्र शिक्षण संचालनालयास देखील लागू आहेत. त्यानुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही तातडीने करावी, ही विनंती.

आपला,

(अनिल चौरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- निवडनस्ती (तांशि-४)

"विवरणपत्र — अ"

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था

सन २०२६-२७ च्या दुष्काळग्रस्त तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफ करण्याबाबतच्या तपशिलाचे विवरणपत्र

(रक्कम रुपयांत)

अ.क्र.	सन २०२६-२७ च्या दुष्काळग्रस्त तालुक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा फी भरलेली आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या	ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपूर्तीसाठी आवश्यक रक्कम	सन २०२६-२७ च्या दुष्काळग्रस्त तालुक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी न भरता प्रमाणपत्र दिले आहेत अशा विद्यार्थ्यांची संख्या	ज्या विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र दाखल केले आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपूर्तीसाठी आवश्यक रक्कम	एकूण विद्यार्थी	एकूण प्रतिपूर्तीची रक्कम

स्वाक्षरी

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, सोबत जोडलेल्या यादीतील विद्यार्थी हे दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील रहिवासी आहेत. त्यामुळे ते परीक्षा शुल्क माफी साठी पात्र आहेत. विद्यार्थ्यांनी शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार १००% परीक्षा शुल्क माफी सवलतीसाठी अर्ज भरलेला नाही, याची खात्री केलेली आहे.

तरी दुष्काळग्रस्त भागातील (----------विद्यार्थी संख्या) व (----------रक्कम) एवढी आहे.

सही/-

विभागीय सहसंचालक

सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
मदत व पुनर्वसन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:- समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक:- २५ सप्टेंबर, २०२६

वाचा:- १) शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/३ दि.०७ ऑक्टोबर, २०१०
२) शासन निर्णय, क्रमांकः संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/म-७, दि. २८ जून, २०१८
३) शासन पत्र क्रमांकः एससी वाय-२०२१/प्र.क्र.१००/म-७, दि. १८ ऑक्टोबर, २०२१
४) शासन निर्णय क्रमांक: एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि. ३१ ऑक्टोबर, २०२३
५) कृषी आयुक्त यांचा अहवाल दि. २४ सप्टेंबर २०२६

प्रस्तावना:

दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ व २ अन्वये सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. खरीप २०२६ च्या हंगामातील परिस्थितीच्या आधारे राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचे Trigger-१ (प्रथम कळ) संदर्भात आयुक्त कृषी यांच्या अहवाला वरून दिसून येते. सदरहू Trigger-१ (प्रथम कळ) नुसार दुष्काळी तालुके घोषित करणे व त्यामध्ये करावयाच्या विविध उपाययोजना व सवलती लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

राज्यातील तालुक्यांमध्ये जून ते आज पर्यंत या कालावधीतील पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचे आयुक्त, कृषी यांच्या अहवालावरून दिसून येते. सदर २६५ तालुक्यांमध्ये Trigger-१ (प्रथम कळ) लागू असल्यामुळे तिथे पंचनामे करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी तात्काळ सुरु करावी. सर्व्हेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शवणारे छायाचित्र व जीपीएस कोऑर्डीनेट संकलन करून पिक परिस्थितीचा अहवाल आयुक्त,कृषी यांच्या मार्फत शासनास तात्काळ सादर करण्यात यावा.

२. राज्यातील दुष्काळग्रस्त Trigger-१ (पहिली कळ) २६५ तालुक्यांत लागू असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे परिशिष्ट-१ मध्ये नमूद एकूण २६५ तालुक्यांतील दुष्काळग्रस्त भागासाठी राज्य शासनाकडून विशेष बाब म्हणून खालील उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

१) जमीन महसूलात सूट

२) पिक कर्जाचे पुनर्गठन

३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती

४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात सूट *(७.५ हॉर्सपावर पर्यंत क्षमतेच्या विजपंपाचे वीज बिल अगोदरच माफ करण्यात आले आहे. त्यावरील वीज पंपांना सदर सुट लागू असेल)*

५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी

६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरु करणे

७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर

८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे

९) शेतीवर आश्रित शेतकरी/मजूर इत्यादी यांना अन्न धान्याची टंचाई होणार नाही याबाबत व्यवस्था उभी करणे

१०) जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध होईल याची व्यवस्था करणे

११) जलसंधारणाची कामे सुरु करणे

१२) अगोदरच निर्गमित करण्यात आलेले शासन निर्देशाप्रमाणे पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी पाण्याचे नियोजन करणे

३. सदर २६५ तालुक्यांमधील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शेत पिकांच्या नुकसानीबाबतची मदत विहीत कार्यपध्दतीची पूर्तता करुन स्वतंत्र शासन निर्णयान्वये जाहीर केली जाईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०९२६१११७४९४९४१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SANJAY SHANKARRAO INGLE
Date: 2026.09.26 11:21:13 +05'30'

(संजय इंगळे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, मलबार हिल. मुंबई

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

३) मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) सर्व मा. लोकसभा सदस्य/राज्यसभा सदस्य (महाराष्ट्रातील)
६) सर्व मा. विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य
७) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८) मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुबई
९) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव (कृषी), कृषी, मंत्रालय, मुंबई
११) अप्पर मुख्य सचिव (महसुल), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुबई
१३) अपर मुख्य सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता), पाणी पुरवठा विभाग, जी. टी हॉस्पीटल, मुंबई
१६) प्रधान सचिव (मृदु व जलसंधारण), मृदु व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुबई
१७) प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) प्रधान सचिव (ऊर्जा), , ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई
१९) आयुक्त (कृषि), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२०) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
२१) महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
२२) सर्व विभागीय आयुक्त
२३) सर्व जिल्हाधिकारी
२४) सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी
२५) वित्त विभाग (व्यय-९/ अर्थसंकल्प/अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.
२६) सर्व सहसचिव/उपसचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई
२७) सह सचिव तथा वित्तिय सल्लागार, मदत व पुनर्वसन, नवीन प्रशासन इमारत, मंत्रालय, म
२८) महसूल व वन विभाग, कार्यासन क्रमांक मदत-१/मदत-३
२९) निवडनस्ती (कार्यासन मदत-२)

शासन निर्णय, क्रमांक:- समिती-2026/प्र.क्र.82/मदत-2

परिशिष्ट-1

खरीप हंगाम-2026 -प्रथम कळ (Trigger-1) लागु झालेल्या तालुक्यांची माहीती

महसूल विभाग	अ.क्र.	जिल्हा	प्रथम कळ (Trigger-1) लागू झालेले तालुके	
			तालुक्यांची नावे	तालुक्यांची संख्या
ठाणे	1	ठाणे	निरंक	0
	2	पालघर	निरंक	0
	3	रायगड	श्रीवर्धन	1
	4	रत्नागिरी	रत्नागिरी,संगमेश्वर, राजापूर	3
	5	सिंधुदुर्ग	सावंतवाडी, दोडामार्ग, कणकवली , कुडाळ, वैभववाडी, मालवण, देवगड, वेंगुर्ला	8
नाशिक	6	नाशिक	मालेगाव, बागलाण, कळवण, नांदगाव, सुरगणा, इगतपुरी, पेठ, सिन्नर, येवला, देवळा	10
	7	धुळे	धुळे, साक्री, सिंदखेडा, शिरपूर	4
	8	जळगांव	एरंडोल , पारोळा, धरणगाव ,चोपडा ,पाचोरा , जामनेर, जळगाव ,भडगाव , अमळनेर ,रावेर, चाळीसगाव,भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर , यावल,	15
	9	नंदुरबार	अक्कलकुवा, शहादा, नंदूरबार, नवापुर, तळोदा, अक्राणी	6
	10	अहिल्यांनगर	नगर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, शेवगाव, पाथर्डी, नेवासा, राहुरी, संगमनेर, अकोले, कोपरगाव, श्रीरामपुर, रहाता	14
पुणे	11	पुणे	भोर, वेल्हा, खेड , शिरूर , बारामती, इंदापूर , दौंड,पुरंदर,	8
	12	सोलापूर	उ. सोलापूर, द. सोलापूर , बार्शी, अक्कलकोट, मोहोळ, माढा, करमाळा पंढरपूर, सांगोला, माळशिरस, मंगळवेढा,	11
	13	सांगली	मिरज, आटपाडी, जत, कवठेमहाकाळ,	4
	14	सातारा	सातारा,खटाव, माण, फलटण, खंडाळा महाबळेश्वर	6

शासन निर्णय, क्रमांक:- समिती-2026/प्र.क्र.82/मदत-2

परिशिष्ट-1

खरीप हंगाम-2026 -प्रथम कळ (Trigger-1) लागु झालेल्या तालुक्यांची माहीती

महसूल विभाग	अ.क्र.	जिल्हा	प्रथम कळ (Trigger-1) लागू झालेले तालुके	
			तालुक्यांची नावे	तालुक्यांची संख्या
	15	कोल्हापूर	पन्हाळा, राधानगरी, गगनबावडा, भुदरगड,आजरा, चंदगड,	6
छ. संभाजीनगर	16	छ. संभाजीनगर	छ. संभाजीनगर, कन्नड, सोयगाव, पैठण, वैजापूर,गंगापूर खुलताबाद, सिल्लोड,फुलंब्री	9
	17	जालना	बदनापूर ,घनसावंगी अंबड , जालना परतूर,मंठा , भोकरदन, जाफ्राबाद	8
	18	बीड	बीड ,गेवराई, माजलगाव, केज, आंबेजोगाई, परळी, आष्टी, पाटोदा, शिरूर कासार, धारूर, वडवणी,	11
	19	लातूर	लातूर, औसा, अहमदपूर, निलंगा, उदगीर, चाकूर, रेणापूर, शिरुरअनंतपाळ, देवणी, जळकोट	10
	20	धाराशिव	धाराशिव, कळंब, भूम, वाशी, तुळजापूर,लोहारा,परांडा ,उमरगा	8
	21	नांदेड	नांदेड, बिलोली, कंधार, लोहा, हदगाव, भोकर, देगलुर, किनवट, हिमायतनगर, माहुर, धर्माबाद, उमरी, अर्धापुर, नायगाव	14
	22	परभणी	पूर्णा, पालम, परभणी, सोनपेठ जिंतूर, गंगाखेड, सेलू, मानवत, पाथरी	9
	23	हिंगोली	हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव , वसमत	5
अमरावती	24	बुलढाणा	जळगावजामोद, संग्रामपुर, चिखली, देऊळगावराजा, मेहकर, बुलडाणा, शिंदेखेडराजा, लोणार, खामगाव, शेगाव, मलकापुर, मोताळा, नांदुरा	13
	25	अमरावती	अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खं., धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगावसुर्जी, तिवसा, धारणी, चिखलदरा, वरुड, मोर्शी, चांदुरबाजार, दर्यापुर	14
	26	अकोला	अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मुर्तीजापूर, बाळापूर बार्शीटाकळी	7

शासन निर्णय, क्रमांकः- समिती-2026/प्र.क्र.82/मदत-2

परिशिष्ट-1

खरीप हंगाम-2026 -प्रथम कळ (Trigger-1) लागु झालेल्या तालुक्यांची माहीती

महसूल विभाग	अ.क्र.	जिल्हा	प्रथम कळ (Trigger-1) लागू झालेले तालुके	
			तालुक्यांची नावे	तालुक्यांची संख्या
	27	वाशिम	वाशीम, रिसोड, मालेगाव, मंगळूरपीर ,कारंजा ,मानोरा	6
	28	यवतमाळ	यवतमाळ, बाभुळगाव, कळंब, दारव्हा, दिग्रस, आर्णी, नेर, पुसद, उमरखेड, महागाव,वणी, मारेगाव, झरी -जामणी, केळापुर, घाटंजी, राळेगाव	16
नागपुर	29	वर्धा	वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, समुद्रपूर, हिंगणघाट, आष्टी	7
	30	नागपूर	नागपूर, कामठी, सावनेर, पारशिवनी, मौदा, भिवापूर, कळमेश्वर, काटोल, रामटेक, हिंगणा,उमरेड, कुही, नरखेड, नागपूर शहर	14
	31	भंडारा	भंडारा, पवनी, लाखंदूर	3
	32	गोंदिया	तिरोडा	1
	33	चंद्रपूर	चंद्रपूर, भद्रावती, गोंडपिंपरी , राजूरा कोरपना, मूल, बरोरा, सावली, चिमूर, नागभिड, सिंदेवाही, पोंभुर्णा	12
	34	गडचिरोली	गडचिरोली, चामोर्शी	2
	एकूण तालुके			265

Digitally signed by SANJAY SHANKARRAO INGLE
Date: 2026.09.26 11:21:30 +05'30'

(संजय इंगळे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

GR 2004072[illegible]

राज्यातील डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांची
शिष्यवृत्ती व मुळे यांची परीक्षा फी
माफ करण्याची योजना.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. एमईबी-२००२/प्र.क्र.३३३/प्रा.शि.-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १८ ऑक्टोबर, २००४.

:- शासन निर्णय :-

राज्यातील काही भागात नेहमी पाऊस पडतो. अशा परिस्थिती निर्माण झाली होती. ज्या ज्या वेळी अशा अवर्षणाची परिस्थिती निर्माण झाली त्या त्या वेळी अवर्षणग्रस्त परिस्थितीचे निवारण करण्यासाठी शासनाने काही योजना कार्यान्वित केल्या होत्या. त्यानुसार डोंगराळ, दुर्गम भागातील इ. ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना परीक्षा मंडळे यांच्या परीक्षा फी माफीची सवलत ही योजना पूर्वी स्वतंत्रपणे कार्यान्वित करण्यात आली होती. याकरिता स्वतंत्रपणे निधी-उपलब्धता निश्चित उपलब्ध करण्यात येत होते. त्यामुळे अवर्षणग्रस्त परिस्थिती ही जवळ जवळ प्रतिवर्षी निर्माण होणारी बाब असल्याने, याकरिता एक नियमित स्वरूपाची योजना कार्यान्वित करणे आवश्यक असल्याचे ठरले आहे. त्यानुसार १९९३-९४ च्या आर्थिक वर्षापासून डोंगराळ, दुर्गम व अवर्षणग्रस्त परिस्थिती राज्यातील ज्या भागात उद्भवेल, त्यांतील डोंगराळ भागातील गरजू विद्यार्थिनी या योजनेतील विद्यार्थ्यांचे व परीक्षा मंडळे यांनी ठरविलेल्या परीक्षा फी माफीच्या सवलतीचा लाभ देण्यास शासन मंजूरी देत आहे.

डोंगराळ भागातील गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व परीक्षा मंडळे यांनी निश्चित केलेल्या परीक्षा फी च्या माफीच्या सवलतीचा लाभ देण्याची योजना मंजूर करण्यात येत आहे :-

[अ] योजनेचे स्वरूप :-

प्रतिवर्षी राज्यातील सर्व भागात जरीही इयत्ता ५ वी ते ७ वी मधील पिढीची सेवानिवृत्ती ठरविण्यात येते. त्यानुसार ज्या गावांची प्रति पैसेवारी ५० पैशा पेक्षा कमी असते ती, गावे डोंगराळ/दुर्गम/अवर्षणग्रस्त म्हणून जाहीर करण्यात येतात. महसूल व कृषी विभागाकडून विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून अशा गावांची यादी तयार करण्यात येते. या यादीतील गावे डोंगराळ/दुर्गम/अवर्षणग्रस्त म्हणून जाहीर हो

[१] ७.वी.टी. योजनेचा लाभ घेणा-या विद्यार्थ्यांना [ ] ही पूर्व सूचीना योजना लिहून या योजनेचा लाभ घेणा-या सर्व विद्यार्थ्यांना योजना लागू राहील.

[२] व्याप्ती :-

ही योजना खाली नमूद केलेल्या परीक्षा मंडळांच्या राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांना लागू होईल :-

[१] महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ [९, १० वी व १२ वी परीक्षा]

[२] तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ,

[३] व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,

[४] कला संचालनालय परीक्षा मंडळ,

[५] शासकीय परीक्षा मंडळाची टी.सी. परीक्षा,

[६] व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील व तेथे शासनाकडून घेतल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमासंबंधी घेतलेल्या व्यवसाय परीक्षा,

[७] कृषी व तत्सदृश विद्यापीठाच्या परीक्षा

[मुक्त विद्यापीठ वगळून]

[८] ही सवलत खालील विद्यार्थ्यांना लागू असणार नाही :-

[१] ज्या विद्यार्थ्यांना शासनाच्या अन्य शैक्षणिक खात्यांतर्गत योजनेनुसार परीक्षा फी माफीची सवलत आधीच आहे.
[उदा. भागासवर्गीय विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत, माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पाल्यांना माध्यमिक स्तराच्या फी माफीची सवलत, प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यांना फी माफीची सवलत.]

[२] जे विद्यार्थी त्याच परीक्षेस पुन:योजना घेतात.
[रिपिटर]

[३] जे विद्यार्थी अंतर्गत (एक्सटर्नल) म्हणून परीक्षा देतात.

[४] ज्या विद्यार्थ्यांचे पालक सध्या प्रत्यक्ष सेवेतून, नोकरी सोडा करतात, परंतु त्यांचे वय सेवानिवृत्तीच्या जवळ आले आहे असे विद्यार्थी.

[९] योजनेची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्यात यावी :-

१] अंतिम वर्षाच्या प्रवेशाच्या वेळी महाविद्यालय-यांनी संबंधित जिल्हा शिक्षणाधिकारी-यांचेकडे व जिल्हाधिकारी-यांकडून सवलत प्राप्त करून घेण्याची दक्षता घ्यावी.

जिल्ह्यांतील सर्व शिक्षण संस्थांना [प्रवेश, इ.साठी विद्यार्थी]
निर्दोषित योग्यप्रकारे माहिती होण्यासाठी.

२] त्यानंतर दिनांकाला आयोजित केलेल्या [परीक्षा] किंवा विद्यार्थ्यांनी परीक्षा फी भरण्याच्या अंतिम दिनांकाच्या किमान सात दिवस आधी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडे ही माहिती सादर करावयास सांगावे.

३] इ.१०-वी व १२ वी या परीक्षांसाठी अर्ज सादर करण्याची मुदत ही सर्वसाधारणपणे १ ऑक्टोबर अशी असते. त्यामुळे या यादीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी भरलेल्या परीक्षा फीची प्रतिपूर्ती करण्याची असल्यास, पात्र असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांबाबतची यादी संबंधित शाळा/महाविद्यालयांच्या मुख्याध्यापकांनी नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात प्राप्त करून घ्यावी.

४] नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज संबंधित जिल्हा शिक्षणाधिकारी [माध्य.] यांचेकडे मुख्याध्यापक/संस्था/महाविद्यालय प्राचार्य यांनी न चुकता पाठवावे.

५]जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांनी त्यांचेकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करून एकत्रित प्रस्ताव २८/२९ फेब्रुवारीपर्यंत शासनाच्या विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे न चुकता पाठवावा.

६]विभागीय शिक्षण उपसंचालकांनी १० मार्चपर्यंत त्यांच्या जिल्ह्यातील प्रस्ताव तपासून देय असलेल्या रकमेचे देयक शासकीय कोषागारातून पारित करून घ्यावे व त्याची [डिमांड ड्राफ्ट] आवश्यक त्या रकमा त्यांनी संबंधित जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे सुपूर्द कराव्यात.

७] त्यानंतर जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांनी संबंधित शिक्षण संस्थामार्फत संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षा फी ची रक्कम परत करावी व त्याचा अहवाल विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे सादर करावा.

८]ज्या परीक्षेच्याबाबत अर्ज स्वीकारण्याची मुदत डिसेंबर/जानेवारी अशी असेल [उदा. विद्यापीठाच्या परीक्षा] त्याबाबत खालील पद्धत अवलंबण्यात यावी.

सवलतीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाच्या/शिक्षण संस्थेच्या प्राधिकाऱ्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे अर्ज विद्यापीठाकडे/परीक्षा मंडळाकडे स्वीकारण्यास पात्र ठरलेल्या प्रमाणपत्रावर स्वाक्षरीकर्ता मुख्याध्यापक व सरोदर या विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती-विवरण पत्रासह तसेच त्या परीक्षा फी चा विस्तृत तपशील देऊन त्यांची फी तसेच अन्य शिक्षणाधिकाऱ्यांनी विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे सादर करण्यात यावीत.

प्रमाणित करण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण परीक्षार्थी या महाविद्यालयात नियमित विद्यार्थी
या विद्यापीठाच्या मार्च १९ ---- या परीक्षेस बसले आहेत.
ते ५ पी. सी. धारक असून ८ वी/१० वी/१२ वी विज्ञान उत्तीर्ण आहेत
म्हणून ते परीक्षा फीची प्रतिपूर्ती मिळण्यास पात्र आहेत.

विभागीय शिक्षण उपसंचालकांनी अर्ज विद्यार्थ्यांची माहिती प्राप्त झाल्यानंतर जे विद्यार्थी अंतिम वर्षाच्या परीक्षा फीच्या प्रतिपूर्ती करण्यासाठी आवश्यक असणारे रहिवासी डिमांड ड्राफ्ट तयार करून विद्यापीठाकडे/परीक्षा मंडळाकडे "प्रतिपूर्ती फी" म्हणून पाठवावे.

या योजनेचे नियंत्रण अधिकारी म्हणून शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
यांना
हे राहतील. या योजनेखाली होणारा खर्च "२२०२-सर्वसाधारण शिक्षण-८०, सर्वसाधारण ८०० इतर खर्च [सोळा] [५] अल्पसंख्यांक या अंतर्गत विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी/प्रतिपूर्ती करणे [२२०२ २५८५] मागणी क्र.---२, या शिर्षाखाली त्या त्या वर्षी मंजूर केलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा. वित्त शासन निर्णय क्रमांक प वन विभाग यांच्याशी सविस्तर चर्चा करून व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भासह सहमती प्राप्त करून त्याच्या अनौपचारिक संदर्भ क्र.प्र.क्र.१०३४/९३/व्यय-५, दि.२८.५.९३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ज. पी. माटे]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक, [उच्च शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
[illegible] महाराष्ट्र राज्य, पुणे.